**महाराष्ट्र शासन- जलसंपदा विभाग**
**समन्वय समिती**
**गट (ब) अराजपत्रित व गट-क सरळसेवा भरती**

**जा.क्र.दप/पमं/सरळसेवा/समन्वय समिती/मेज-२/ ४९५ / सन २०२३** **दि.: ०९.११.२०२३**

## शुध्दिपत्रक - २

विषय :- जलसंपदा विभागार्तगतची भुतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट ब (अराजपत्रित) गट क संवर्गातील नामनिर्देशानाच्या कोटयातील पदे सरळसेवेने भरणेबाबत.

संदर्भ :- समन्वय समिती, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई जाहिरात क्र. मुअ/ जसंविकोप्र/ आ ७(२)/३५३० दि.०१.११.२०२३

१. उपरोक्त संदर्भिय जाहिरातीतील मुददा क्र. ६ (६.२.२) विविध संवर्गातील किमान व कमाल वयोमर्यादाचा तपशील नमुद करण्यात आलेला आहे. सदर तपशीलामध्ये खालील प्रवर्गाचा समावेश करणेत येत आहे.

| अ.क्र | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (ईडब्लूएस) उमेदवाराकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः राआधी ४०१९ /प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ मधील तरतुदीनुसार, इतर मागास प्रवर्गास लागू असलेनुसार कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील. |
| २ | अनाथ | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ - २०२२ /प्र.क्र. १२२/का-०३ दि. ०६ एप्रिल २०२३ मधील तरतुदीनुसार अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास अनुसूचित जाती प्रवर्गासाठी निश्चित केलेले निकष लागू असलेने कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील. |

तथापि, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय सनिव २०२३/ प्र.क्र १४ / कार्या १२ दि. ३ मार्च २०२३ अन्वये दि. ३१ डिसेंबर २०२३ पुर्वी प्रसिध्द होणाऱ्या भरती जाहिराती करिता कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे शिथिलता दिलेली असल्याने वर नमूद प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता असेल.

२. उपरोक्त संदर्भिय जाहिरातीतील मुद्दा क्र.५ पदाच्या निवडीसाठी कार्यपध्दती, आवश्यक कागदपत्रे तसेच महत्वाच्या अटी व शर्ती, या मधील ५.१ च्या खाली, ५.१.१ अंतर्भुत करण्यात येत आहे.

५.१.१ संवर्ग १ ते १४ या पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. रिपभ/प्र. क्र. ६६/२०११/ई-१० दिनांक २७ जुन २०११ नुसार त्या उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म हा महाराष्ट्र राज्यात झाल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. ज्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला नसेल परंतु महाराष्ट्र राज्यातील रहिवास सलग १५ वर्ष व त्यापेक्षा अधिक कालावधीचा आहे अशा उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

**स्थळ प्रत मा. अध्यक्ष समन्वय समिती यांचे मान्यतेने**

(सविता च. बोधेकर)
सदस्य सचिव
समन्वय समिती तथा
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी,
दक्षता पथक, पाटबंधारे विभाग,
मुंबई परिमंडळ, ठाणे